**मेट्रो - 3 स्टेशन परिसर नाविन्यपूर्ण नियोजन स्पर्धेत**

**रचना संसद अकॅडमी ठरली विजेता**

**पिल्लई कॉलेज ऑफ आकिटेक्चर यांना दुसरा तर रचना संसद अकॅडमी ऑफ आकिटेक्चर (विनाअनुदानित) यांना तृतिय पुरस्कार**

मुंबई, 22 नोव्हेंबर, 2019 : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) आणि ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ओआरएफ) यांनी मेट्रो -3 स्टेशन परिसराच्या नाविन्यपूर्ण नियोजनासाठी घेतलेल्या स्पर्धेचा निकाल आज घोषित करण्यात आला. यामध्ये रचना संसद अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर यांना प्रथम, पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांना द्‌वितीय तर रचना संसद अकॅडमी ऑफ आर्किटेक्चर (विनाअनुदानित) यांनी तृतिय क्रमांक पटकाविला. विजेत्या संघाना आज एमएमआरडी येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे रिअल टाईम प्रोजेक्टच्या डिझायनिंगमध्ये महाविद्‌यालयीन विद्‌यार्थ्यांना सहभागी करण्याची ही पहिलीच वेळ होती.

08 मार्च 2019 रोजी मुंबई महानगरातील अभियंता आणि विद्‌यार्थ्यांसाठी 2 टप्यात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आली होती. यामध्ये एकूण 51 संघ सहभागी झाले. प्रत्येक संघामध्ये 3 ते 5 सदस्यांचा समावेश होता. एमएमआरसी आणि ओआरएफने प्रोजेक्टला चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी कार्यशाळा, साईट व्हिजिट आणि सहभागी संघासाठी ओरिएंटेशन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. एकूण 16 संघांना निवडून त्यातून अंतिम 8 संघांना विविध प्रकारात पुरस्कृत करण्यात आले.

स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे -

अ.क्र. विजेता क्रमांक/तपशील पुरस्काराचे स्वरूप महाविद्‌यालयाचे/ नाव संघ सदस्य

1. प्रथम – 60 हजार रूपये रोख रचना संसद अकॅडमी ऑफ आकिटेक्चर अनुश्री शेट्‌टी, पार्थ बने, वैष्णवी अय्यर, सुमीत गवळी, सुशांत निखारे

2. द्वितीय – 40 हजार रुपये रोख पिल्लई कॉलेज ऑफ आकिटेक्चर श्रेया राठोड, स्नेहल चौधरी, श्रेया मोहन, समीर हरहरे

3. तृतीय - 30 हजार रुपये रोख रचना संसद अकॅडमी ऑफ आकिटेक्चर (विनाअनुदानित) अमेय कोडलकर, मानस केळुसकर, सुचेतन सोनवणे

4. लक्षणीय तपशील - 10 हजार रूपये रोख लोकमान्य टिळक इन्स्टीट्युट ॲन्ड डिझाईन स्टडीजसिमरन ठाकूर, मिशेल वास, तन्वी शिंदे

5. सादरीकरण गुणवत्ता - 10 हजार रूपये रोख भारती विद्यापीठ ईशानी प्रधान, सागर निपुर्ते, अलख सिंग, तेजस वैद्य

6. परिवर्तनीय संकल्पना - 10 हजार रूपये रोख पिल्लई कॉलेज ऑफ आर्किटेक्चर पूर्वा गावडे, प्रणाली शाह, पीयुष मंडल

7. पादचारी आणि मोटार विहीन वाहतूक प्राधान्य - 10 हजार रूपये रोख पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मोहित श्रीवास्तव, अनिरुद्ध कामरकर, जोएल डॅनियल

8. विशेष गती श्रेणी - 10 हजार रूपये रोख सीटीईएस कॉलेज ऑफ आर्किटेक्चर सेमतिका मौर्य

स्पर्धेक निवड मंडळामध्ये एमएमआरसीएलचे कार्यकारी संचालक नियोजन, श्री. आर. रमना, ओआरएफ आणि चेअरमन रेल्वे बोर्डचे संचालक श्री. विवेक सहाय, प्रख्यात आर्किटेक्ट श्री. रतन बाटलीबोई, अखिल भारतीय संस्था स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वरीष्ठ शहर नियोजक प्राची मर्चंट, डब्ल्यूआरआय रॉस सेंटरच्या प्रमुख श्रीमती राजीस मॅथ्यू, अशा विविध प्रभागातील तज्ज्ञ समाविष्ट होते.

एमएमआरसीएलच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, एमएमआरसीएल नेहमीच नाविन्यपूर्ण कल्पना आणि नवीन संकल्पना राबविण्यात अग्रेसर असते. यामुळे भविष्यातील पायाभूत सुविधांच्या डिझाइन नावारुपात येताना अविश्वसनीय प्रतिभेचे धनी असलेले तरुण आमच्याबरोबर कार्य करेल. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्रीमती अश्विनी भिडे यांनी यावेळी ओआरएफचे आभार व्यक्त केले.